मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कोल्हापूर यांचे कार्यालय
आवक क्र. १००३
दिनांक: 19 SEP 2015
...क्रमांक
स्वाक्षरी

उपवनसंरक्षक, सातारा वन विभाग, सातारा यांचे कार्यालय
'वनभवन' गोडोली रोपवाटीका परिसर, सातारा 415 001
☎ (02162)220058, फॅक्स : (02162) 220059 ईमेल : forest.satara68@gmail.com

विषय :- जमिन - सातारा मौजे लिंब ता. जि. सातारा येथील गट नं. ९८८ मधील जमिन मिळण्याबाबत.

जा.क्र. अ/कक्ष-११/सर्व्हे/२०१५.१६/ १००३
सातारा ४१५ ००१ दिनांक : १५.०९.२०१५ १८

प्रति,
मुख्य वनसंरक्षक (प्रा.)
कोल्हापूर

संदर्भ - १. कार्यासन अधिकारी महसूल व वन विभाग मुंबई यांचे कडील पत्र क्र.एफएलडी-२०/२०१५ अनौ.१९/प्र.क्रं.३३६/फ-३, दिनांक १५.०६.२०१५
२. आपले कडील पत्र क्रं.कक्ष-५/तांस/सर्व्हे/सातारा/लिंब/१५.१६/२६७० दि. ३१.०८.२०१५
३. वनक्षेत्रपाल, सातारा यांचे कडील पत्र क्रं.अ/सर्व्हे/२०१५.१६/२९७ दि. ०२.०९.२०१५
४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संधारण) म.रा.नागपूर यांचे कडील पत्र क्रं.कक्ष-१२ जमिन/कोल्हापूर/ प्र.क्रं.१६९ (१५.१६)/४४४ दि. १३.०८.२०१५
५. या कार्यालयाकडील पत्र क्रं. अ/कक्ष-११/सर्व्हे/२०१५.१६/९४० दि.०५.०९.२०१५
६. आपले कडील पत्र क्रं.कक्ष-५/तांस/सर्व्हे/सातारा/लिंब/१५.१६/२८९४ दि. ११.०९.२०१५

उपरोक्त संदर्भिय अन्वये कळविण्यात येते कि, मौजे लिंब ता.जि.सातारा येथील गट नंबर ९८८ बाबत जिल्हाधिकारी सातारा यांनी सन २०११ मध्ये वनविभागाचा अभिप्राय मागणी केलेला होता. त्यावेळी या विभागाकडे जा.क्र. ५८५६ दिनांक ११.०१.२०११ व जा.क्र. ५५४६ दिनांक २२.०२.२०१२ अन्वये जिल्हाधिकारी सातारा यांना अभिप्राय देणेत आलेला आहे. तसेच तहसिलदार सातारा यांना जा.क्र. २०४ दिनांक १९.०४.२०११ अन्वये अभिप्राय देणेत आलेला आहे. सदरच्या तीनही पत्रांच्या छायांकित प्रती (पा.नं.१० ते १२) यासोबत देण्यात आलेल्या आहेत.

मौजे लिंब ता.जि.सातारा येथील गट नंबर ९८८ च्या ७/१२ अभिलेखा सदरी इतर अधिकारामध्ये मा.उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग सातारा यांचे नांव दाखल झालेले आहे. या प्रकरणी जिल्हाधिकारी सातारा यांनी त्यांचेकडील पत्र क्र.कु.का. सिलिंग/कावि/४७६/२०१४ दिनांक २७.०६.२०१४ अन्वये मा. विभागीय आयुक्त पुणे विभाग पुणे यांना अहवाल सादर केलेला आहे. सदर अहवालानुसार मा. विभागीय आयुक्त पुणे यांनी त्यांचेकडील पत्र क्र.क.कर/सिलिंग/आरआर/१५०/२०१४ दिनांक ०७.०८.२०१४ ने मा. अप्पर मुख्य सचिव,( ज-५ अ) महसूल व वनविभाग मुंबई यांना अहवाल सादर केला आहे. सदरचे दोन्हीही संदर्भिय अहवाल यासोबत देण्यात येत आहेत. सदर अहवालामध्ये सामाजिक वनीकरण विभागाकडील अभिप्राय घेणेत आलेले आहेत. त्यामध्ये सामाजिक वनीकरण

विभागाने सदरचे क्षेत्र रोडलगत असलेने रोपे निर्मितीकरीता रोपवाटिका स्थापन करणे व सामाजिक वनीकरण विभागामार्फत करणेत येणा-या वृक्ष लागवडीसाठी संशोधनात्मक बाबींकरीता या क्षेत्राची आवश्यकता आहे असा अभिप्राय दिलेला आहे.

प्रकरणी विभागीय आयुक्त पुणे विभाग, पुणे यांनी शासनास लिहिलेल्या पत्रामध्ये मौजे लिंब ता.जि.सातारा स.नं.९८८ क्षेत्र पो.ख. ३२ हे. ४७ आर या जमिनीपैकी २ हेक्टर क्षेत्र शेती प्रयोजनासाठी देता येईल असे जिल्हाधिकारी सातारा यांनी प्रस्तावित केले आहे. अर्जदार हे युध्दात कामी आलेल्या सैनिकाच्या विधवा पत्नी (War widow) असल्यामुळे फळलागवडीसाठी २ हेक्टर जमीन देणेस हरकत नाही, तथापी शासन स्तरावर पुढील योग्य ते आदेश होणेस विनंती आहे असे कळविणेत आलेले आहे. सदरचा अहवाल दस्तऐवजांच्या छायांकित प्रती पा. नं. १ ते २३ यासोबत आपले माहितीसाठी सविनय सादर करीत आहे.

Am.

**उपवनसंरक्षक,**
**सातारा वनविभाग,सातारा**